
महाराष्ट्र शासन


महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.



# शाळेतले पहिले पाऊल








| | | | |
|---|---|---|---|
| १ | जानेवारी | ७ | जुलै |
| २ | फेब्रुवारी | ८ | ऑगस्ट |
| ३ | मार्च | ९ | सप्टेंबर |
| ४ | एप्रिल | १० | ऑक्टोबर |
| ५ | मे | ११ | नोव्हेंबर |
| ६ | जून | १२ | डिसेंबर |

सप्ताहाचे वार

रविवार, सोमवार, मंगळवार, बुधवार, गुरुवार, शुक्रवार, शनिवार






प्रथम
उपक्रमात सहभागी स्वयंसेवी संस्था.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## शाळेतले पहिले पाऊल


- **प्रवर्तक** : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य.
- **प्रकाशक** : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **मार्गदर्शक** : **मा. रनजीत सिंह देओल (भा.प्र.से.),**
  प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य.
  **मा. सूरज मांढरे (भा.प्र.से.),**
  आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे.
  **मा. प्रदीपकुमार डांगे (भा.प्र.से.),**
  राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
- **संपादक** : **मा. अमोल येडगे (भा.प्र.से.),**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **सहसंपादक** : **डॉ. शोभा खंदारे**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी संपादक** : **डॉ. माधुरी सावरकर**
  उपसंचालक, सेवापूर्व शिक्षण, बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **संपादन साहाय्य** : **डॉ. गितांजली बोरुडे**
  वरिष्ठ अधिव्याख्याता, बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **श्रीम. सुषमा कोंडुसकर**
  अधिव्याख्याता, बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **श्रीम. सुप्रिया नवले**
  विषय सहायक, बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **सुधारित आवृत्ती** : जानेवारी २०२४
- **अर्थसाहाय्य** : 'STARS' प्रकल्पांतर्गत, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
- **मुद्रक** : रुना ग्राफिक्स, पुणे.



- © सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन.

# थोडे माझ्याबद्दल!

माझे नाव ____________

माझे वय ◯ वर्षे आहे.

माझ्या गावाचे नाव ____________ आहे.

माझ्या मित्र/मैत्रिणीचे नाव ____________ आहे.

मला ____________ बघायला आवडतो.

मला हे करायला आवडते.

____________

____________

____________

____________

माझा आवडता

रंग ____________

पदार्थ ____________

प्राणी ____________

माझे आवडते पुस्तक ____________

माझा फोटो

मोठे होऊन मला ____________ बनायचे आहे.


| | |
|---|---|
| माझे नाव | : ____________ |
| माझ्या आईचे नाव | : ____________ |
| माझ्या वडिलांचे नाव | : ____________ |
| माझ्या गावाचे नाव | : ____________ |

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| शरीराचे अवयव | १ |
| रंग | २ |
| आकार | ३ |
| माझे कुटुंब | ४ |
| ऋतूंची ओळख | ५ |
| सप्ताहाचे वार व वर्षाचे महिने | ६ |
| फळांची व भाज्यांची ओळख | ७ |
| पक्षी व प्राण्यांची ओळख | ८ |
| वाहनांची व फुलांची ओळख | ९ |
| जोड्या जुळव | १० |
| चित्रवाचन १ | ११ |
| चित्रवाचन २ | १२ |
| चित्रवाचन ३ | १३ |
| चित्रवाचन ४ | १४ |
| अक्षर गिरविणे | १५ |
| चांगल्या सवयी | १६ |
| मैदानी खेळ | १७ |
| बडबडगीते | १८ |
| मोज व लिही | १९ |
| लहान-मोठा व कमी-जास्त | २० |
| वर्गीकरण कार्ड | २१ |
| क्रमाने लावणे | २२ |
| अक्षर तक्ता | २३ |
| अंक तक्ता | २४ |
| सृजनात्मक कृती १ | २५ |
| सृजनात्मक कृती २ | २७ |
| सृजनात्मक कृती ३ | २८ |
| सृजनात्मक कृती ४ | २९ |
| सृजनात्मक कृती ५ | ३० |
| अभियान गीत | ३१ |
| पालकांसाठी | ३२ |
| कृतिपत्रिका १ ते १२ | ३९ |
| पालक समूहासाठी आयडिया कार्ड १ ते १२ | ५१ |

# शरीराचे अवयव

शाळापूर्व तयारी





पालकांसाठी सूचना – आपल्या शरीराच्या अवयवांची नावे आणि त्यांची कार्ये यांबद्दल मुलांशी बोला. जसे,

- ✡ नाकाने आपण काय करतो?
- ✡ कानाने आपण कोण-कोणते आवाज ऐकतो?
- ✡ जर आपल्याला डोळे नसते, तर काय झाले असते?
- ✡ बोटांच्या मदतीने आपण कोणती सर्वांत लहान वस्तू उचलू शकतो?


# रंग


शाळापूर्व तयारी

रंग ओळख.





रंग व चित्राची जोडी जुळव.






# आकार

शाळापूर्व तयारी



## वर्तुळ







## त्रिकोण









## चौकोन



## आयत



पालकांसाठी सूचना – आकारांची संकल्पना दृढ होण्यासाठी घरातील विविध वस्तूंचा वापर केल्यास मुलांना लवकर आकार समजण्यास मदत होते.

# माझे कुटुंब

शाळापूर्व तयारी




पालकांसाठी सूचना – शक्य असल्यास कुटुंबातील सदस्यांचे फोटो चिकटवा किंवा त्यांची नावे लिहा आणि मुलांसोबत त्यावर आधारित गप्पा मारा. जसे,

आजी आणि आजोबा कोणाला म्हणतात?

काका वडिलांचे कोण लागतात?

ताईचे/दादाचे आणि तुमचे नाते काय आहे?


# ऋतूंची ओळख

शाळापूर्व तयारी


# उन्हाळा



# पावसाळा



# हिवाळा



पालकांसाठी सूचना – उन्हाळा, पावसाळा व हिवाळा हे ऋतू कसे ओळखतात? उन्हाळा, पावसाळा व हिवाळा या ऋतूंत कोणते कपडे घालतात? कोणकोणती फळे खातात? तसेच कोणते सण, उत्सव येतात? यांबाबत मुलांशी गप्पागोष्टी करा.

# सप्ताहाचे वार व वर्षाचे महिने

शाळापूर्व तयारी

सप्ताहाचे वार

सप्ताहाचे वार

- रविवार
- सोमवार
- मंगळवार
- बुधवार
- गुरुवार
- शुक्रवार
- शनिवार

पालकांसाठी सूचना – कोणत्या दिवशी शाळेला सुट्टी असते, तसेच इतर दिवशी घरी काय काय केले जाते याबाबत मुलांशी चर्चा करा.

वर्षाचे इंग्रजी महिने

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जानेवारी | ७ | जुलै |
| २ | फेब्रुवारी | ८ | ऑगस्ट |
| ३ | मार्च | ९ | सप्टेंबर |
| ४ | एप्रिल | १० | ऑक्टोबर |
| ५ | मे | ११ | नोव्हेंबर |
| ६ | जून | १२ | डिसेंबर |

पालकांसाठी सूचना – घरातील व्यक्तींचा वाढदिवस कोणकोणत्या महिन्यांत येतो याबाबत मुलांशी चर्चा करा.

# फळांची व भाज्यांची ओळख

शाळापूर्व तयारी


आंबा


डाळिंब


कलिंगड


पेरू


केळी


चिकू


पालकांसाठी सूचना – चित्रात दाखविलेली कोणती फळे तुम्ही खाल्ली आहेत, कोणती फळे गोड आहेत, कोणती आंबट आहेत याबाबत मुलांशी चर्चा करा.

पालकांसाठी सूचना – चित्रात दाखविलेल्या कोणत्या भाज्या तुम्हांला आवडतात, कोणत्या आवडत नाहीत, कोणत्या भाज्या तुमच्या बाजारात मिळतात, याबाबत मुलांशी चर्चा करा.


कांदा


बटाटा


टोमॅटो



गाजर


मटार


भेंडी

# पक्षी व प्राण्यांची ओळख

शाळापूर्व तयारी



मोर



कावळा



चिमणी



कबुतर



पोपट



कोकिळा

पालकांसाठी सूचना– आपण यांतील कोणते पक्षी पाहिले आहेत, मोर कोणत्या ऋतूत नाचतो, पोपटाला कोणते फळ खायला आवडते, याबाबत मुलांशी चर्चा करा.

पालकांसाठी सूचना – यांतील कोणते प्राणी तुमच्या आसपास दिसतात, यातील कोणते प्राणी तुम्ही जंगलात किंवा प्राणिसंग्रहालयात पाहिले आहेत, याबाबत मुलांशी चर्चा करा.



कुत्रा



मांजर



गाय



बकरी



सिंह



वाघ

# वाहनांची व फुलांची ओळख

शाळापूर्व तयारी



सायकल



मोटारसायकल



बस



आगगाडी



कार



विमान

पालकांसाठी सूचना – यातील कोणत्या वाहनामधून तुम्ही प्रवास केला आहे, यातील कोणत्या वाहनाला इंधनाची गरज नसते याबाबत मुलांशी चर्चा करा.

पालकांसाठी सूचना – यातील कोणते फूल पाण्यात उगवते, कोणत्या फुलांचा सुगंध तुम्हांला आवडतो, याबाबत मुलांशी चर्चा करा.



गुलाब



मोगरा



झेंडू



जास्वंद



कमळ




सूर्यफूल

शाळापूर्व तयारी

# जोड्या जुळव.

भाग – १



भाग – २



शाळापूर्व तयारी

# चित्रवाचन १



पालकांसाठी सूचना – या चित्रावर आधारित मुलांसोबत गप्पा मारा. त्यांना या चित्रात काय–काय दिसते आहे, ते विचारा.

# चित्रवाचन २


शाळापूर्व तयारी



पालकांसाठी सूचना – या चित्रावर आधारित मुलांसोबत गप्पा मारा. त्यांना या चित्रात काय-काय दिसते आहे, ते विचारा.

# चित्रवाचन ३

शाळापूर्व तयारी



पालकांसाठी सूचना – या चित्रावर आधारित मुलांसोबत गप्पा मारा. त्यांना या चित्रात काय–काय दिसते आहे, ते विचारा.

# चित्रवाचन ४


शाळापूर्व तयारी



पालकांसाठी सूचना - या चित्रावर आधारित मुलांसोबत गप्पा मारा. त्यांना या चित्रात काय-काय दिसते आहे, ते विचारा.

# अक्षर गिरविणे

शाळापूर्व तयारी




**पालकांसाठी सूचना – यानुसार वर्णमालेतील काही अक्षरांच्या लेखनाचा सराव हवेत हात फिरवून किंवा वाळूमध्ये गिरवून मुलांकडून करून घ्यावा.**

# चांगल्या सवयी

शाळापूर्व तयारी


रोज सकाळी लवकर उठणे.


सर्वांशी चांगले वागणे.


रोज दात घासणे.


नेहमी नीटनेटके राहणे.


रोज आंघोळ करणे.


रोज वाचन करणे.


जेवणापूर्वी व नंतर हात धुणे.


शिंकताना तोंडावर रुमाल ठेवणे.



रोज अंगणवाडीत/शाळेत जाणे.



रोज रात्री वेळेवर झोपणे.


पालकांसाठी सूचना – आपल्या जीवनात चांगल्या सवयींचे काय महत्त्व आहे याबाबत मुलांशी चर्चा करा. तसेच वाईट सवयींबाबतही चर्चा करा.

शाळापूर्व तयारी


# मैदानी खेळ



















पालकांसाठी सूचना – चित्रांत दाखविलेल्या विविध खेळांबाबत मुलांशी चर्चा करा आणि इतर मुलांबरोबर खेळण्यासाठी आपल्या मुलाला प्रेरित करा.

# बडबडगीते


शाळापूर्व तयारी

## ससा ससा

ससा ससा, दिसतो कसा ?
कापूस पिंजून ठेवलाय जसा !

लाल लाल, डोळे छान,
लहान शेपूट, मोठे कान.
पाला खाऊन फुगतो टुम,
चाहूल लागताच पळतो धूम !


## माकडा माकडा

माकडा माकडा हुप हुप कर,
चिंचेच्या झाडावर लवकर चढ.

चिंचा तोडून हातात घे,
त्यातली मला एकच दे.
मीठ लावून चिंच खाईन,
टुक टुक माकड करून दाखवीन.

## करंगळी मरंगळी

करंगळी, मरंगळी, मधले बोट, चाफेकळी, अंगठा ।
तळहात, मळहात, कोपर, खांदा ।।
गळागुट्टी, मानगुट्टी, हनुवटी, गालाच्या पुऱ्या ।
दाताचे बोळके, नाकावरचा राग ।।
काजळाच्या डब्या, देवाचा पाट ।
वर चिमण्यांचा किलबिलाट ।।



## आई मला छोटीशी बंदूक दे ना


आई मला छोटीशी बंदूक दे ना,
बंदूक घेईन, शिपाई होईन,
ऐटीत चालेन, एक दोन तीन ।

आई मला छोटीशी मोटार दे ना,
मोटार घेईन, ड्रायव्हर होईन,
गावाला जाईन, पॉम पॉम पॉम ।


## माकड आणि पापड

एक होते माकड, त्याने आणले पापड.
माकड चढले झाडावर, पापड पडले जमिनीवर,

झाड होते वाकडे तिकडे
पापडाचे झाले तुकडे तुकडे.
तुकडे पडले जिकडे तिकडे,
माकड धावे इकडे तिकडे.

## नाचतो डोंबारी


ढमा ढमा ढोल गं, झनन झनन झांजरी
नाचतो डोंबारी गं नाचतो डोंबारी ।
तारेवर नाचतो – कोलांट्या मारतो
पैसा पैसा मागतो, डोंबारी नाचतो ।।१।।
उद्याच्या पोटाची–काळजी कशाला
आभाळ पांघरून–दगड उशाला
घाम कसा गाळितो हा, डोंबारी नाचतो ।।२।।


**पालकांसाठी सूचना – वर दिलेली बडबडगीते तुम्ही स्वत: मुलांना गाऊन दाखवा.**


# मोज व लिही.


शाळापूर्व तयारी






















शाळापूर्व तयारी

# लहान–मोठा



# कमी–जास्त




पालकांसाठी सूचना – लहान–मोठा, कमी–जास्त, जड–हलके अशा वेगवेगळ्या संकल्पना वस्तू किंवा चित्रांच्या मदतीने मुलांना सांगा. (जड–हलके या संकल्पनेसाठी कापूस आणि पाणी भरलेला पेला अशा वस्तू घेऊ शकता.)

# वर्गीकरण कार्ड


शाळापूर्व तयारी











पालकांसाठी सूचना – पुस्तकाच्या शेवटी पृष्ठ क्र. ३५ व ३७ वर काही चित्रे दिलेली आहेत. ती कापून वर दिलेल्या चौकटींमध्ये योग्य चित्र ठेवून वर्गीकरणाची कृती मुलांकडून करून घेणे.


# क्रमाने लावणे

शाळापूर्व तयारी

चित्रे चढत्या क्रमाने लाव.



चित्रे उतरत्या क्रमाने लाव.



पालकांसाठी सूचना – पुस्तकाच्या शेवटी पृष्ठ क्र. ३३ वर क्रम लावा या शीर्षकांतर्गत चित्रे दिलेली आहेत. ती कापून वरील गोलात योग्य क्रमाने मुलांकडून लावून घ्यावीत.

# अक्षर तक्ता

शाळापूर्व तयारी






| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ | आ | इ | ई | उ | ऊ | ए |
| ॲ | ऐ | ओ | ऑ | औ | अं | अ: |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क | ख | ग | घ | च |
| छ | ज | झ | ट | ठ |
| ड | ढ | ण | त | थ |
| द | ध | न | प | फ |
| ब | भ | म | य | र |
| ल | व | श | ष | स |
| ह | ळ | क्ष | ज्ञ | |

पालकांसाठी सूचना – वरील अक्षर तक्ता शक्य असल्यास घरात दर्शनी भागावर टांगावा.
जेणेकरून मुलांच्या नजरेस सतत पडत राहील. शक्य तेव्हा पालकांनी मुलांसमवेत त्याचे वाचन करावे.


# अंक तक्ता


शाळापूर्व तयारी

| | |
|---|---|
| १ |  |
| २ |  |
| ३ |  |
| ४ |  |
| ५ |  |
| ६ |  |
| ७ |  |
| ८ |  |
| ९ |  |
| १० |  |


पालकांसाठी सूचना – वरील अंक तक्ता शक्य असल्यास घरात दर्शनी भागावर टांगावा; जेणेकरून मुलांच्या नजरेस सतत पडत राहील. शक्य तेव्हा पालकांनी मुलांसमवेत त्याचे वाचन करावे.


# सृजनात्मक कृती १








पालकांसाठी सूचना – कागदाच्या मदतीने मागील पानावर दाखविलेल्या कृतींनुसार मुलांकडून पक्षी तयार करून घ्या.








૧) 


૨) 


૩) 

૪) 

૫) 


૬) 

૭) 

૮) 

# सृजनात्मक कृती २

शाळापूर्व तयारी





पालकांसाठी सूचना – उजवीकडे दाखविलेल्या चित्रानुसार मुलांकडून वरील चित्रात रंग भरून घ्या.


# सृजनात्मक कृती ३

शाळापूर्व तयारी

पालकांसाठी सूचना – कागदावर काडीपेटीच्या काड्या चिकटवून मुलांकडून होडी तयार करून घ्या.
कागदाच्या वरच्या बाजूला कापसाने ढग काढायला सांगा आणि तांदूळाचे दाणे चिकटवून पाऊस दाखवायला सांगा.

# सृजनात्मक कृती ४

शाळापूर्व तयारी



पालकांसाठी सूचना – भेंडी, कांदे, अंगठा, बोटे, बटाटे, पाने तसेच रंग इत्यादींचा वापर करून वरील चित्रात मुलांकडून ठसे काम करून घ्या.

शाळापूर्व तयारी

# सृजनात्मक कृती ५



पालकांसाठी सूचना – मुलांचे दोन्ही तळहात रंगीत पाण्यात बुडवून तळहाताचे ठसे वरील जागेत उमटवा.

# अभियान गीत

## आमची मुलं हो तयार....

शाळेला जायचंय मोठं ही व्हायचंय
वाचाय-लिहायला, गणित शिकायचंय ।
आनंद मला हो फार
आमची मुलं हो तयार...
आमची मुलं हो तयार... ।।ध्रु।।

नाव-गाव सांगतात
रंग ओळखतात
वस्तूही मोजतात
ओळखतात सगळे आकार... आमची... ।।१।।

अंक ओळखतात
अक्षर ओळखतात
गोष्टीही सांगतात
समजतात सगळे विचार... आमची... ।।२।।

गाणी पण म्हणतात
नाचून दाखवतात
स्वच्छ ही राहतात
आत्मविश्वास यांचा फार... आमची... ।।३।।

ताई पण म्हणतात
बाई पण म्हणतात
गावातले बोलतात
शहरातले बोलतात
आमची मुलं हो तयार...
आमची मुलं हो तयार... ।।४।।

**स्मितीन ब्रीद**

## पाटी नं पेन्सिल

पाटी नं पेन्सिल घेऊ द्या की रं।
मला बी मेळाव्याला येऊ द्या की रं ।।ध्रु।।

गाणी गोष्टी बी मिळून म्हणू।
गोलात फेर धरून फिरू।
गाण्याच्या तालावर नाचू द्या....
मला गाण्याच्या तालावर नाचू द्या की रं ।।१।।

मला येतात रंगांची नावं।
आकार वार बी मला हाय ठावं।
वर्षांचं महिनं बी शिकू द्या......
मला वर्षांचं महिनं बी शिकू द्या की रं ।।२।।

अक्षरांची गाडी चाले पटपट।
अंकांशी बी करतो मी झटपट।
अंक अक्षरांचं खेळ मला येऊ द्या....
अंक अक्षरांचं खेळ मला येऊ द्या की रं ।।३।।

कमी की जास्त फरक सांगा
मी लहान की मोठा याचा मनात दंगा
आईला बी समजून सांगू द्या....
आईला बी समजून सांगू द्या की रं ।। ४ ।।

**(काठी न घोंगडं घेऊ द्या - या गाण्याची चाल)**

**सुवर्णा फडतरे**

# पालकांसाठी

शाळापूर्व तयारी

***नमस्कार,***


***सध्या तुमची मुले अंगणवाडी-बालवाडी किंवा तत्सम वर्गामध्ये गेली असतील किंवा नसतील, परंतु येत्या शैक्षणिक वर्षात ते इयत्ता पहिलीमध्ये तर नक्की जाणार आहेत; म्हणजेच ते शाळेत पहिले पाऊल टाकणार आहेत. चला, तर मग त्यांचा हा प्रवास सुकर होण्यासाठी त्यांना साहाय्य करूया.. शाळा सुरू होण्यासाठी आणखी दोन-अडीच महिन्यांचा कालावधी आहे. तोपर्यंत आपण आपल्या बालकांसोबत बसून त्यांची शाळापूर्व तयारी करून घेऊया.***

**आपण काय करू शकतो ?**

*पुढचे एक-दोन महिने आपण आपल्या मुलांसोबत दररोज थोडा वेळ खालील गोष्टी केल्या, तर त्यांची इयत्ता पहिलीची तयारी (शाळेची तयारी) पक्की होऊ शकते.*

❍ **रोज मुलाला एक नवीन गोष्ट सांगा :**

त्यांना तुमच्याकडे पाहून ऐकण्याची सवय व्हायला पाहिजे, कारण जेव्हा ते शाळेत जातील तेव्हा शिक्षकांकडे पाहून ऐकण्याची सवय होईल. गोष्टींमुळे ऐकण्याची व आकलनाची क्षमता वाढेल, त्यांना नवीन–नवीन शब्द ऐकायला मिळतील. गोष्ट ऐकल्यानंतर त्यांना सोपे प्रश्न विचारा.




❍ **शाळेतले पहिले पाऊल या पुस्तिकेच्या मदतीने :**



- स्वत:चे नाव व पत्ता सांगता आला पाहिजे, स्वत:बद्दल बोलता आले पाहिजे.
- आपल्या शरीराच्या अवयवांची नावे व त्यांची कामे सांगता आली पाहिजेत.
- रंगांची ओळख व त्यांची नावे सांगता आली पाहिजेत.
- लहान–मोठा, जवळ–लांब, जड–हलका, कमी–जास्त हे समजले पाहिजे.
- गोल, त्रिकोण व चौकोन या आकारांची ओळख झाली पाहिजे.
- आपल्या कुटुंबाबद्दल माहिती झाली पाहिजे.
- ऋतू, वर्ष, महिने, आठवड्यांची माहिती झाली पाहिजे.
- फळांची, फुलांची, भाज्यांची, पक्ष्यांची, प्राण्यांची, वाहनांची ओळख झाली पाहिजे.
- चित्र पाहून बोलता आले पाहिजे, चित्रात काय आहे याबद्दल सांगता आले पाहिजे.
- अक्षर आणि अंक (१० पर्यंत) ओळखून मोजता आले पाहिज़ेत.
- एकसमान वस्तूंच्या व एकमेकांशी संबंधित वस्तूंच्या जोड्या लावता आल्या पाहिजेत.

**या चला! पहिल्यांदाच शाळेत जाणाऱ्या आपल्या मुलांची तयारी आपण मिळून करूया!**

# क्रमाने लावणे.



पालकांसाठी सूचना – वरील चित्रे कापून त्यांची फ्लॅशकार्ड बनवा. क्रमाने लावा ही संकल्पना समजावून देण्यासाठी त्याचा वापर करा.

# वर्गीकरण (वाद्य व कपडे)

शाळापूर्व तयारी


















पालकांसाठी सूचना – वरील चित्रे कापून त्यांची फ्लॅशकार्डे बनवा व <u>वर्गीकरण</u> ही संकल्पना समजावून देण्यासाठी त्याचा वापर करा.

# वर्गीकरण (भाज्या व आकार)


शाळापूर्व तयारी




















पालकांसाठी सूचना – वरील चित्रे कापून त्यांची फ्लॅशकार्डे बनवा व वर्गीकरण ही संकल्पना समजावून देण्यासाठी त्याचा वापर करा.




# बालकांसाठी



कृतिपत्रिका - १

## बिंदू जोडणे



## छत्री



चित्रात रंग भर.

# बालकांसाठी

## कृतिपत्रिका – ३











चित्र ओळख.

## आकार

वर्तुळ



चौकोन




कागदाचे छोटे–छोटे तुकडे करून चिकटविणे.

# बालकांसाठी


कृतिपत्रिका – ५

**बिंदूरेषेवरून गिरव व पानांच्या जोड्या लाव.**







# बालकांसाठी




कृतिपत्रिका – ६


**चित्रे मोजून अंक लिही.**
















## पाहुणा ओळख.







# बालकांसाठी


## कृतिपत्रिका – ८



आकारांची जोडी लाव.
























# बालकांसाठी



## कृतिपत्रिका – ९

**नमुना बघून काढ.**



चित्र व अक्षर यांच्या जोड्या लाव.


बदक — म


फणस — न


मगर — घ



घर — ब


नळ — फ

# बालकांसाठी


कृतिपत्रिका – ११

शरीराचे अवयव व त्यांची नावे यांच्या जोड्या लाव.


| | | |
|---|---|---|
|  | डोळे | पाय |
|  | नाक | कान |
|  | जीभ | हात |
|  | दात | डोळे |
|  | कान | नाक |
|  | हात | दात |
|  | पाय | जीभ |


**दिलेल्या सूचनेनुसार चित्रावर गोल कर.**

**सर्वांत मोठा**








**सर्वांत लहान**





**वेगळी वस्तू**

# पालक समूहासाठी आयडिया कार्ड क्र. १ व 2

## १

### पाहू आणि गप्पागोष्टी करू.




व्हिडिओ येथून डाउनलोड करा.

प्रत्येक कुटुंबात आई-बाबा हे मुलांचे पहिले शिक्षक असतात. तथापि, मुलांच्या शिकण्यासाठी जर आपण वस्तीमध्ये एकत्र आलो तर, एकमेकांची मदत करू शकतो. यासाठी आपल्याला आठवड्यातून कमीत-कमी एकदा तरी भेटावे लागेल. भेटी होतील, चर्चा होईल आणि विचारांची देवाणघेवाण होईल. चला, व्हिडिओच्या मदतीने समजून घेऊया की, आपण काय करू शकतो.

### घरी जाऊन मुलांसोबत कृती करूया!


पाहा आणि समजून घ्या. दाखविलेले चित्र कागदावर काढा आणि मुलांसोबत पूर्ण करा.




कृतिपत्रिका १ - बिंदू जोडणे.

## २

### स्वागत आणि सुरुवात



बालगीत येथे पाहूया.

- एकमेकांची खुशाली विचारून आजचा संवाद सुरू करूया.
- मागील आठवड्यामध्ये जे ऐकले, पाहिले आणि जे काम करायचे ठरविले त्याबद्दल एकमेकांना सांगू. आपण दिलेले काम पूर्ण केलेत का?
- 'दात घासा' हे बालगीत पाहू, ऐकू आणि सोबत गाऊ. मुलांकडून हावभावासह म्हणवून घेऊ.

### पाहू आणि गप्पागोष्टी करू.





व्हिडिओ येथून डाउनलोड करा.

आपण जसे उत्तमरीत्या चालू, धावू शकतो. त्याप्रकारे मुलांना चालता, धावता यायला हवे. आपण अशा कृती घेतल्यास मुलांना शरीराचा तोल सावरण्यास, चालण्यास, धावण्यास चालना मिळू शकते.

चला व्हिडिओच्या मदतीने समजून घेऊया की, आपण काय करू शकतो.

### घरी जाऊन मुलांसोबत कृती करूया!

दिलेली कृती पाहून, ऐकून व समजून घ्या. मुलांसोबत कृती करा.





कृतिपत्रिका २ - चित्रात रंग भर.

# पालक समूहासाठी आयडिया कार्ड क्र. ३ व ४

## ३

### स्वागत आणि सुरुवात

- एकमेकांची खुशाली विचारून आजचा संवाद सुरू करूया.
- मागील आठवड्यामध्ये जे ऐकले, पाहिले आणि जे काम करायचे ठरविले त्याबद्दल एकमेकांना सांगू. दिलेले काम आपण पूर्ण केले का?
- 'जेवायच्या आधी' हे बालगीत पाहू, ऐकू आणि सोबत गाऊ. मुलांकडून हावभावासह म्हणवून घेऊ.



बालगीत येथे पाहूया.

### पाहू आणि गप्पागोष्टी करू.


आसपासचे ऐकून, पाहून, समजून, बोलून, अनुभव घेऊन मुलांचे छोटेसे जग हळूहळू मोठे होत असते. यात पालक म्हणून आपली भूमिका खूप महत्त्वाची ठरते. प्रत्येक नवीन गोष्टीची ओळख प्रत्याक्षरीत्या तसेच चित्रांद्वारे करून दिल्यास मुलांना समजणे सोपे जाते. चला व्हिडिओच्या मदतीने समजून घेऊया की, आपण काय करू शकतो?




व्हिडिओ येथून डाउनलोड करा.

### मिळून काही करू.

घरून काही वस्तू आणू. सर्व वस्तू एका पिशवीत भरू. पिशवीत न पाहता फक्त स्पर्शाने वस्तू ओळखण्याचा प्रयत्न करू. प्रत्येक पालकांना खेळायला सांगू.



### घरी जाऊन मुलांसोबत कृती करूया!

दिलेली कृती पाहून, ऐकून व समजून घ्या. मुलांसोबत कृती करा.

कृती

पालक व बालक यांनी मिळून रद्दी कागदांचे/मातीचे ५ वेगवेगळ्या आकाराचे गोळे करावेत. बालकाने ते गोळे लहान ते मोठा आणि मोठा ते लहान या क्रमाने लावावेत.




कृतिपत्रिका ३ – चित्र ओळख.

## ४

### स्वागत आणि सुरुवात


- एकमेकांची खुशाली विचारून आजचा संवाद सुरू करूया.
- मागील आठवड्यामध्ये जे ऐकले, पाहिले आणि जे काम करायचे ठरविले त्याबद्दल एकमेकांना सांगू. आपण दिलेले काम पूर्ण केलेत का?
- 'आपली पाच बोटे' हे बालगीत पाहू, ऐकू आणि सोबत गाऊ. मुलांकडून हावभावासह म्हणवून घेऊ.



बालगीत येथे पाहूया.

### पाहू आणि गप्पागोष्टी करू.


प्रत्येक नवीन गोष्टीची ओळख प्रत्याक्षरीत्या तसेच चित्रांद्वारे करून दिल्यास मुलांना समजणे सोपे जाते, त्यांचा शब्दसंग्रह वाढतो हे आपण पाहिले आहे. याच्या पुढील पायरी म्हणजे समान वस्तूंच्या जोड्या लावणे, एकमेकांशी संबंधित असलेल्या वस्तूंच्या जोड्या लावणे ही होय. ही कृती आपण प्रत्यक्ष वस्तूंचा वापर करून तसेच चित्रांद्वारे कशी करू शकतो हे या व्हिडिओच्या मदतीने समजून घेऊया.




व्हिडिओ येथून डाउनलोड करा.

### मिळून काही करू.


जमिनीवर त्रिकोण आणि चौकोन काढू. सर्व मिळून त्याच्या भोवती फिरू. एका आकाराचे नाव घेऊन त्यात उडी मारू.



### घरी जाऊन मुलांसोबत कृती करूया!

पाहा आणि समजून घ्या. दाखविलेले चित्र कागदावर काढा आणि मुलांसोबत पूर्ण करा.

बिंदू जोडून चित्र पूर्ण करा.



कृतिपत्रिका ४ – कागदाचे छोटे छोटे तुकडे करून चिकटविणे.

# पालक समूहासाठी आयडिया कार्ड क्र. ५ व ६

## ५

### स्वागत आणि सुरुवात

- एकमेकांची खुशाली विचारून आजचा संवाद सुरू करू.
- मागील आठवड्यातील कृती करताना आलेले अनुभव सांगू.
- 'मराठी मुळाक्षरे' हे बालगीत पाहू, ऐकू आणि सोबत गाऊ.




बालगीत येथे पाहूया.

### पाहू आणि गप्पागोष्टी करू.

गणिताचे आपल्या आयुष्यात महत्त्वाचे स्थान आहे. शाळेत, व्यवहारात मुले गणिती क्रिया करीत असतात. त्या रोजच्या व्यवहारात येतच असतात. त्याची पूर्वतयारी आपण मुलांकडून याच वयात करून घेतल्यास पुढील आयुष्यात मुलांना गणित कठीण वाटणार नाही.
चला व्हिडिओच्या मदतीने समजून घेऊया की, आपण करू शकतो.




व्हिडिओ येथून डाउनलोड करा.

F9U5G9

### मिळून काही करू.

जुने कागद घेऊन आपली आवडती वस्तू तयार करू या. बनविलेल्या वस्तूंवर आपल्या मुलांचे नाव लिहून त्यांना ती वस्तू भेट म्हणून देऊ. ज्या पालकांना वस्तू बनविताना अडचणी येत असतील, तर त्यांना मदत करू.



### घरी जाऊन मुलांसोबत कृती करूया!

चित्रात दाखविल्यानुसार काही अक्षरकार्डे बनवून मुलांना द्या. मुलांना घरातील वस्तू दाखवा. जसे – मोबाईल, चमचा, घड्याळ, खुर्ची इ. वस्तूंच्या नावातील पहिले अक्षर उच्चारल्यावर मुलांना त्यावर अक्षरकार्ड ठेवायचे आहे.
जसे – मोबाईल.

घ
च
ख
म




कृतिपत्रिका ५ – बिंदूरेषेवरून गिरव व पानांच्या जोड्या लाव.

## ६

### स्वागत आणि सुरुवात

- एकमेकांची खुशाली विचारून आजचा संवाद सुरू करू या.
- मागच्या आठवड्यामध्ये जे पाहिले, ऐकले व जो अभ्यास केला, त्याबद्दल एकमेकांना सांगू. मुलांसोबत कृती करताना काही अडचण आली का?
- 'ट्रॅफिक लाईट' हे बालगीत पाहू, ऐकू आणि सोबत गाऊया.



बालगीत येथे पाहूया.

### पाहू आणि गप्पागोष्टी करू?

आसपासच्या वस्तूंचा वापर वेगळ्या पद्धतीने केल्यास काहीतरी नवीन निर्माण केल्याचा आनंद होतो. तसेच या कृतींद्वारे मुलांच्या बोटांची पकड, डोळे व बोटांचा समन्वय चांगल्या प्रकारे होतो. या व्हिडिओत आपण रंग, कापूस, स्पंज, बोटे यांचा वापर करून तयार केलेली सुंदर कलाकृती पाहू शकतो.





व्हिडिओ येथून डाउनलोड करा.

V5L7C1

### मिळून काही करू.

विविध रंगांच्या मदतीने आपल्या आवडीची रांगोळी काढून एकमेकांना दाखवू.
ज्या पालकांना रांगोळी काढण्यात अडचणी येत असतील, त्यांना मदत करू.
ज्या पालकांनी सुंदर रांगोळी काढली आहे. त्यांच्यासाठी टाळ्या वाजवू.



### घरी जाऊन मुलांसोबत कृती करूया!

कागदाचे चौकोनी तुकडे करून त्यावर वेगवेगळी अक्षरे लिहून अक्षरकार्डे तयार करा. डब्यात सगळी कार्डे एकत्र करा. दोन कार्डे उचलून त्यापासून कोणता शब्द तयार होतो हे मुलांना विचारा. हा खेळ खेळत रहा. गरज पडल्यास मुलांना मदत करा.

क प

कप

कृतिपत्रिका ६ – चित्रे मोजून अंक लिही.

# पालक समूहासाठी आयडिया कार्ड क्र. ७ व ८

## ७

### स्वागत आणि सुरुवात

- एकमेकांची खुशाली विचारून आजचा संवाद सुरू करूया.
- मागच्या आठवड्यामध्ये 'अक्षरकार्डाच्या मदतीने नवीन शब्द तयार करणे' ही कृती मुलांना सोपी वाटली का? मुलांनी कोणकोणते शब्द तयार केले?
- 'एक-दोन-तीन' हे बालगीत पाहू, ऐकू आणि सोबत गाऊ.



बालगीत येथे पाहूया.

### पाहू आणि गप्पागोष्टी करू?

ठसेकाम या कृतीप्रमाणे या कृतीमधूनही मुलांना नवीन निर्माण केल्याचा आनंद मिळतो. हात-बोटांची पकड, स्नायूंचा विकास, डोळे व बोटांचा समन्वय चांगल्या प्रकारे होतो. यासाठी घरातील चपातीच्या पिठात काही रंग मिसळून वापर करता येतो.
चला व्हिडिओच्या मदतीने समजून घेऊया की, आपण काय करू शकतो.



चला वेगवेगळ्या प्रतिमा बनवूया.

व्हिडिओ येथून डाउनलोड करा.

P4F2G2

### मिळून काही करू.

चला, अक्षरकार्डांमधून एक कार्ड उचलू. त्या अक्षरापासून एका मिनिटात जेवढे शब्द लिहिता येतील तेवढे लिहूया.
ज्या पालकांचे सर्वांत जास्त शब्द लिहून होतील, त्यांच्यासाठी टाळ्या वाजवूया.

म → मका, माणूस, मासा

### घरी जाऊन मुलांसोबत कृती करूया!

कपडे अडकविण्याचा हँगर घ्या. चित्रात दाखविल्यानुसार त्यांच्या दोन्ही टोकांना दोऱ्याने दोन कप लटकवा. दोन्ही कपात एक-एक वस्तू ठेवा. दोन्ही वस्तूंपैकी कोणती जड व कोणती हलकी आहे हे मुलांना सांगायला सांगा. अशा वेगवेगळ्या वस्तू घेऊन सर्व वस्तूंमध्ये सर्वात जड वस्तू कोणती व सर्वात हलकी वस्तू कोणती तिचे नाव सांगायला सांगा.



कृतिपत्रिका ७ – पाहुणा ओळख.

## ८

### स्वागत आणि सुरुवात

- एकमेकांची खुशाली विचारून आजचा संवाद सुरू करूया.
- मागील आठवड्यामध्ये 'जड व हलक्या वस्तू ओळखणे' ही कृती मुलांना सोपी वाटली का? मुलांनी कोणकोणत्या वस्तू घेतल्या? कोणती वस्तू सर्वांत लहान व कोणती वस्तू सर्वांत मोठी सापडली?
- One, Two Buckle My Shoe' हे बालगीत पाहू, ऐकू आणि सोबत गाऊ.



बालगीत येथे पाहूया.

### पाहू आणि गप्पागोष्टी करू.

आपल्या सभोवताली, कितीतरी रंग आपल्याला दिसतात. आपले जीवन रंगाशिवाय अपूर्ण आहे.
मुलांना या रंगांची ओळख आपण आसपासच्या वस्तूंद्वारेसहज करून देऊ शकतो.
चला व्हिडिओच्या मदतीने समजून घेऊया की, आपण काय करू शकतो?



चित्राद्वारे रंग ओळख

व्हिडिओ येथून डाउनलोड करा.

S3K9M1

### मिळून काही करू.

शब्दांच्या चिठ्ठ्या बनवून पिशवीत ठेवू. डोळे बंद करून त्यातील ४-५ चिठ्ठ्या काढू.
जे शब्द येतील त्या शब्दांच्या मदतीने मुलांसाठी छानशी गोष्ट बनवू.
ज्या पालकांना गोष्ट बनविण्यात अडचण येत असेल, त्यांना मदत करू.

घर | चिमणी | कार

एक दिवस राजूच्या स्वप्नात चिमणी आली. चिमणी कार चालवत होती. तिने राजूला गिफ्ट दिले व घरी यायचे आमंत्रण दिले.

### घरी जाऊन मुलांसोबत कृती करूया!

चित्रात दाखविल्यानुसार कागदापासून मगरीचे तोंड तयार करा. मुलांना कमी-जास्त संकल्पना समजून घेण्यासाठी याचा उपयोग करा. जसे-जास्त वस्तूंकडे मगरीचे उघडलेले तोंड ठेवायचे. हा खेळ वस्तूंसोबत, वस्तू व अंकांसोबत तसेच अंकांसोबत खेळा.




कृतिपत्रिका ८ – आकारांची जोडी लाव.

# पालक समूहासाठी आयडिया कार्ड क्र. ९ व १०

## ९

### स्वागत आणि सुरुवात

- एकमेकांची खुशाली विचारून आजचा संवाद सुरू करूया.
- मागील आठवड्यामध्ये 'कमी-जास्त वस्तू/संख्यांमध्ये तुलना करणे' ही कृती मुलांनी कशाप्रकारे केली याचे अनुभव सांगा.
- 'घरापुढे थांबला टांगा...' हे बालगीत पाहू, ऐकू आणि सोबत गाऊ.



बालगीत येथे पाहूया.

### पाहू आणि गप्पागोष्टी करू?

पाहुणा ओळख ही कृती घरगुती वस्तूंचा वापर करून सहज करता येते. जसे - ३ कांदे व १ बटाटा मुलांसमोर ठेवून यात वेगळे कोण आहे हे विचारा. यात घरातील विविध वस्तूंचा वापर आपण करू शकतो. ही कृती चित्रकार्डांच्या मदतीने आपण कशी घेऊ शकतो हे या व्हिडिओच्या मदतीने समजून घेऊया.




व्हिडिओ येथून डाउनलोड करा.

P614U8


### मिळून काही करू.

चला, शब्दांच्या भेंड्या खेळू. खेळ सुरू करण्यासाठी एक पालक कोणताही एक शब्द सांगतील. शब्दाचे शेवटचे अक्षर घेऊन पुढील पालक दुसरा शब्द सांगतील. जसे - शाल... लबाड... डमरू

शाल
लबाड
डमरू

### घरी जाऊन मुलांसोबत कृती करूया!

मुलांना सोबतच्या चित्राप्रमाणे घरातील उपलब्ध चित्र दाखवा व चित्रांच्या मदतीने गोष्ट सांगण्यास मदत करा. गोष्टीला छानसे नाव द्या. गोष्ट सांगतानाचा मुलांचा व्हिडिओ #shalapurvtayari2022 हा हॅशटॅग वापरून समाजमाध्यमांवर अपलोड करा.



कृतिपत्रिका ९ - नमुना बघून काढ.

## १०

### स्वागत आणि सुरुवात

- एकमेकांची खुशाली विचारून आजचा संवाद सुरू करूया.
- मागील आठवड्यामध्ये गोष्ट सांगणे ही कृती मुलांनी कशी केली याबद्दलचे अनुभव पालक सांगतील.
- 'साफसफाई करा' हे बालगीत पाहू, ऐकू आणि सोबत गाऊ.




बालगीत येथे पाहूया.

### पाहू आणि गप्पागोष्टी करू.

मुलांना सोप्या पद्धतीने तसेच खेळाद्वारे मोजणे ही क्रिया समजावून सांगितल्यास त्यांना पटकन समजते. हे आपण घरातील कामे करता-करता सहज करू शकतो. जसे-जेवताना ताटात मोजून चपात्या वाढाव्या. धुतलेले कपडे मोजावे इ.
चला, व्हिडिओच्या मदतीने आपल्याला कशा प्रकारे काम करायचे आहे हे समजून घेऊ.




व्हिडिओ येथून डाउनलोड करा.

J3S6N8

### मिळून काही करू.

चला, आपण गेल्या दोन दिवसात काय जेवलो यावर बोलूया. त्या खाण्यातून आपल्याला पोषक घटक मिळतात का? दाखविलेल्या चित्रावरून आपण समजून घेऊया की, कोणते पदार्थ किती प्रमाणात खाल्ल्यास आपल्याला पोषण मिळते.



### घरी जाऊन मुलांसोबत कृती करूया!

वस्तूंची लांबी कशी मोजावी हे सांगण्यासाठी आपण घरातील वस्तू घेऊन (जसे- टेबल, टीव्ही, कपाट, ग्लास इ.) हाताच्या मदतीने कशा मोजतात हे दाखवा. म्हणजे एक वीत. अशा प्रकारे प्रत्येक वस्तू किती वीत आहे हे मुलांना मोजायला सांगा. गरज पडल्यास त्यांना मदत करा.



कृतिपत्रिका १० - चित्र व अक्षर यांच्या जोड्या लाव.

# पालक समूहासाठी आयडिया कार्ड क्र. ११ व १२

## ११

### स्वागत आणि सुरुवात

- एकमेकांची खुशाली विचारून आजचा संवाद सुरु करूया.
- मागील आठवड्यातील कृती करताना आलेले अनुभव सांगू. मागील आठवड्यामध्ये लांबी मोजणे ही कृती मुलांनी कशाप्रकारे केली याचे अनुभव सांगा.
- 'आकारांचे गाणे' हे बालगीत पाहू, ऐकू आणि सोबत गाऊ.




बालगीत येथे पाहूया.

### पाहू आणि गप्पागोष्टी करू.

आयडिया कार्ड १० वरील 'घरातील वस्तूंची लांबी कशी मोजावी' ही कृती झाल्यावर व्हिडिओच्या मदतीने आपण अंक ओळख कशी करू शकतो हे समजून घेऊया. अंक कार्ड व वस्तूंची सांगड घालून दाखवू.
जसे – १ – , २ – ,३ –
व्हिडिओच्या मदतीने समजून घेऊया की, आपण अंक ओळख कशी करू शकतो?





व्हिडिओ येथून डाउनलोड करा.

J1P4A2

### मिळून काही करू.

एक गमतीशीर खेळ खेळूया. दोन पालकांचा एक गट, याप्रमाणे गट करूया. सोबत कागद व पेन घेऊया. पहिले पालक डोळ्यांवर पट्टी बांधून, कागदावर गोल, त्रिकोण व चौकोन असे आकार काढण्याचा प्रयत्न करतील, तर दुसरे पालक आकार बरोबर येण्यासाठी त्यांना आवश्यक सूचना देतील.



### घरी जाऊन मुलांसोबत कृती करूया!

जमिनीवर एक रेषा काढा. चित्रात दाखविल्याप्रमाणे ० ते १० पर्यंतचे अंक त्यावर लिहा. मुलांना एका अंकावर उभे राहण्यास सांगा. उदाहरणार्थ ०. आता त्यांना पुढच्या अंकावर उडी मारण्यास सांगा. जसे, ० वरून १ नंतर २ व नंतर ३ वर उडी मारण्यास सांगा. मुलांना प्रश्न विचारा तुम्ही ३ वरून किती वेळा उडी मारून ६ पर्यंत पोहोचाल? हा खेळ वेगवेगळे अंक घेऊन खेळा.




कृतिपत्रिका ११ – शरीराचे अवयव व त्यांची नावे यांच्या जोड्या लाव.

## १२

### स्वागत आणि सुरुवात

- एकमेकांची खुशाली विचारून आजचा संवाद सुरु करूया.
- मागच्या आठवड्यामध्ये कृती करताना मुलांना मजा आली का? यावर चर्चा करा.
- 'शेपटीवाल्या प्राण्यांची भरली होती सभा' हे बालगीत पाहू, ऐकू आणि सोबत गाऊ.



बालगीत येथे पाहूया.

### पाहू आणि गप्पागोष्टी करू?

तुम्ही लहानपणी गोष्टी ऐकल्यात का? गोष्टी ऐकण्याचे खूप फायदे आहेत. जसे– मुले विविध कल्पना करू लागतात, नवीन शब्दांची ओळख होते आणि समस्या सोडविण्याचे, विचार करून बोलण्याचे त्यांचे कौशल्य वाढते. यासाठी तुम्ही मुलांना रोज एक गोष्ट सांगाल का? चला व्हिडिओच्या मदतीने समजून घेऊया.





व्हिडिओ येथून डाउनलोड करा.

L8X7Y5

### मिळून काही करू.

चला, सर्व गोलाकार बसू. घरून आणलेली झाडांची पाने गोलात ठेवू. एक–एक पान उचलून त्यात कोणती आकृती दिसते याचा विचार करू. कल्पनेचा वापर करून काही नवीन बनविण्याचा प्रयत्न करू. तसेच इतर पालकांना मदत करू.



### घरी जाऊन मुलांसोबत कृती करूया!

मुलांच्या आवडीची कोणतीही गोष्ट मुलांना हावभावासहित सांगा. मुलांना गोष्टीवर आधारित प्रश्न विचारा. मुलांना कल्पनेच्या दुनियेत भरारी मारू द्या.

शर्यत



चार मित्र आपापल्या खेळण्यांची शर्यत लावतात .

**विशेष सूचना :** गेले काही आठवडे आपण मुलांची शाळेची तयारी करीत आहोत. पुढील सुट्टीतही खंड पडणार नाही याची काळजी घेऊ. जूनमध्ये शाळा सुरू होईपर्यंत असेच भेटत राहू व हसतखेळत मुलांची शाळेची तयारी करू.

कृतिपत्रिका १२ – दिलेल्या सूचनेनुसार चित्रावर गोल कर.